22 DEC 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवात विद्यापीठाला सर्वसाधारण विजेतपद

## राजस्थान-उदयपूरमधील ३३ वा पश्चिम विभागीय युवा महोत्सव, डॉ. ए. एम. गुरव यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजस्थान – उदयपूरमधील मोहनलाल सुखाडीया युनिव्हर्सिटीमध्ये १५ ते १९ डिसेंबर या कालावधीत ३३ वा पश्चिम विभागीय युवा महोत्सव पार पडला. या युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाला सर्वसाधारण विजेतेपद मिळाले. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या संघाला मोहनलाल सुखाडीया युनिव्हर्सिटीचे कुलगुरू व अभाविपचे अनिल आंबेकर यांच्या हस्ते पारितोषिक देवून गौरविण्यात आले. बक्षीस वितरणप्रसंगी 'जय जय जय शिवाजी, जय जय जय भवानी'च्या गजरात व ढोलताश्याच्या तालावर शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी जल्लोष केला.



कोल्हापूर : राजस्थान येथील मोहनलाल सुखाडीया युनिव्हर्सिटी येथे पश्चिम विभागीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने पटकावलेले सर्वसाधारण विजेतेपद मान्यवरांच्या हस्ते स्वीकारताना डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. होणगेकर.

३३ वा पश्चिम विभागीय युवा महोत्सवात गोवा, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान या चार राज्यातील ३१ विद्यापीठांनी सहभाग नोंदविला होता. या युवा महोत्सवातील सुगम संगीत, वादविवाद स्पर्धा, मांडणी शिल्प, एकांकीका, व्यंगचित्र रेखाटन अशा २६ कलाप्रकारांपैकी २५ कलाप्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट सादरीकरणामुळेच हे यश मिळाल्याची प्रतिक्रिया विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी व्यक्त केली.

### युवा महोत्सवात ९ कलाप्रकारात यश

युवा महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने व्यंगचित्रमध्ये प्रथम क्रमांक, स्पॉट पेंटींग प्रथम, कोलाज (कातरकाम) प्रथम, एकांकिका प्रथम, तालवाद्य व्दितीय, सूरवाद्य प्रथम, भारतीय समुह गीत व्दितीय, पाश्चिमात्य समुह गीत प्रथम, लोकनृत्यामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. ७ कलाप्रकारात प्रथम, २ कलाप्रकारात व्दितीय क्रमांक पटकावल्याबद्दल सर्वसाधारण विजेतपद शिवाजी विद्यापीठ संघाला मिळाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2017
लोकमत



उदयपूर (राजस्थान) येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकविले.

# शिवाजी विद्यापीठाला युवा महोत्सवात विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : उदयपूर (राजस्थान) येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकविले. या महोत्सवात गेल्या ३३ वर्षांमध्ये पहिल्यांदाच विद्यापीठाला यश मिळाले आहे.

उदयपूरमधील मोहनलाल सुखाडिया विद्यापीठात हा महोत्सव दि. १५ ते १९ डिसेंबरदरम्यान रंगला. यामध्ये व्यंगचित्र, स्थळचित्रण, कोलाज, एक अंकी नाटक, एकल शास्त्रीय वादन (तबला), तालवाद्य (सतार), पाश्चिमात्य आणि भारतीय समूहगीत, लोकनृत्य प्रकारांत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने बाजी मारली. त्याच्या जोरावर सर्वसाधारण विजेतेपद मिळाले. संघात ४० कलाकारांचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2017
पुढारी

# पश्चिम विभागीय आंतर युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ अजिंक्य

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** उदयपूर (राजस्थान) येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. या महोत्सवात मागील ३३ वर्षांनंतर पहिल्यांदाच यश मिळवले. उदयपूर दि. १५ ते १९ डिसेंबर कालावधीत मोहनलाल सुखदिया विद्यापीठात हा महोत्सवात पार पडला. यात गायन, पाश्चिमात्य व भारतीय समूह गीत, लोकनृत्य व्यंगचित्र, स्थळचित्रण, कोलाज, एकपात्री, एकलशास्त्रीय वादन, आदी प्रकारांत विद्यापीठाच्या संघाने सर्वोत्तम कामगिरी केली. विद्यापीठातील चाळीस विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता.

22 DEC 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बौद्धकालीन अवशेषांच्या अभ्यासाची गरज

## डॉ. मंजिरी भालेराव यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागात व्याख्यान

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्राचीन काळी कोल्हापूर परिसरात बौद्ध संस्कृती नांदत होती. या संस्कृतीचे पुरावे आज बौद्ध स्तूप, लेणी आणि बौद्ध भिक्खूंचे साहित्य आदींच्या अवशेषाच्या रुपाने आढळून येतात. कुशिरे – पोहाळे येथील पांडव लेणी नसून ती बौद्ध लेणी आहेत. त्यामुळे कोल्हापुरात सापडणाऱ्या बौद्धकालीन अवशेषांचा अभ्यास आणि संशोधन करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पुणे येथील प्राच्यविद्या अभ्यास केंद्रातील डॉ. मंजिरी भालेराव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागात पुणे येथील इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, वेस्टर्न रिजनल सेंटरतर्फे 'प्राचीन कोल्हापूर आणि परिसर' या विषयावर त्या बोलत होत्या. इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. भालेराव म्हणाल्या, महाराष्ट्रातील



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागातर्फे आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. मंजिरी भालेराव.**

कोल्हापूर, कराड, रत्नागिरी, नाशिक–मुंबई रोड, जुन्नर, नान घाट, आदी भागात गौतम बुद्ध आणि त्यांच्या अनुयायी यांचे वास्तव्य होते, या संदर्भातील अनेक पुरावे सापडतात. कोल्हापूर आणि परिसरात प्राचीन काळी बौद्ध धर्माचा प्रभाव होता, हे सांगणारे असंख्य पुरावे, अवशेष उपलब्ध आहेत. पोहाळे येथील गुफेत बौद्ध विहारासह बौद्ध संस्कृतीची आठवण सांगणारे अनेक पुरावे आजही उपलब्ध आहेत. कोल्हापूर शहरातील जुन्या पुलाजवळ संस्थानकाळात बौद्ध कालिन स्तुप सापडला होता. या अवशेषावरून प्राचीन काळी कोल्हापूर परिसरात बौद्ध धर्माचे अस्तित्व असल्याचे स्पष्ट होते.

प्राचीन काळी कोल्हापूर आणि रोम यांच्यात व्यापार होत असल्याचे अस्सल पुरावे आजही उपलब्ध आहेत, असे सांगून डॉ. भालेराव म्हणाल्या, ब्रह्मपुरीतील उत्खननात सापडलेले दगड, पेट्या, भांडी, काही मूर्ती यातून रोमन संस्कृतीशी संबंध असल्याची माहिती पुढे आली आहे. टाऊन हॉलमधील वस्तू संग्रहालयात आजही या संदर्भातील अवशेष पाहण्यास उपलब्ध आहेत. कोल्हापुरात रोमन व्यापाऱ्यांशी व्यापार, व्यवहार होत असल्याचे पुरावे आल्याने प्राचीन काळी कोल्हापूर परदेशातील व्यापार करत असल्याचे स्पष्ट होते. त्यातून दोन्ही संस्कृतीवर प्रकाश पडण्यास मदत होते.

महाराष्ट्रासह कोल्हापूरातील प्राचीन काळातील बौध्द संस्कृती व ऐतिहासिक घटनांचा जगभरातील संशोधक अभ्यास करीत आहेत, मात्र यामध्ये भारताचे संशोधक फारच कमी आहेत, अशी खंतही डॉ. भालेराव यांनी व्यक्त केली. बौध्द, अश्मयुगीन काळातील सापडलेल्या अवशेषांवर इतिहास संशोधक, अध्यासक यांनी संशोधन करावे. असेही त्या म्हणाल्या.

डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. निलांबरी जगताप यांनी आभार मानले. यावेळी माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. अरूण भोसले, विभागीय माहिती अधिकारी सतीश लळीत, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड, संशोधक व इतिहासप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अंबाबाई मंदिराचाही अभ्यास व्हावा

अंबाबाई मंदिराच्या रचनेत हिंदू, जैन धर्माचा आणि शाक्य पंथाचा प्रभाव दिसतो. अंबाबाई मंदिराच्या गाभाऱ्यातील तीन खोल्यांच्या व्दारावर पूर्वी व्दारपालिका असल्याची टिपणे आहेत. त्यामुळे अंबाबाई मंदिराचाही नव्याने अभ्यास होण्याची गरज आहे. तसेच तत्कालीन समाज, संस्कृती आणि जीवनशैली समजून घेण्याची आवश्यकता आहे, असेही डॉ. भालेराव यांनी सांगितले.

### अंबाबाईच्या मूर्तीचा वज्रलेप व अभिषेक थांबवला पाहिजे

करवीर निवासिनी अंबाबाईच्या मूळ मूर्तीचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. अंबाबाईच्या मूर्तीला वज्रलेप टाळावा तसेच मूर्तीला अभिषेक न करता अंबाबाईच्या उत्सवमूर्तीला अभिषेक करावा, असा सल्ला डॉ. भालेराव यांनी यावेळी दिला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2017
पुढारी

# आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेस प्रारंभ

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील शिवाजी विद्यापीठ आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेचे उद्‌घाटन जिल्हाध्यक्ष नागेश चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. अ‍ॅड. दिग्विजय कुराडे, प्रा. डॉ. एस.वाय. कोतमिरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. चौगुले म्हणाले, तलवारबाजी हा खेळ धाडसी व शौर्याचा खेळ आहे. या खेळातून अनेक खेळाडू घडले पाहिजेत. मुलींना हा खेळ स्वसंरक्षणाच्या दृष्टीने सर्वात गरजेचा खेळ आहे. या धाडशी खेळातून अनेक खेळाडू घडावेत व देशाचे नाव उज्ज्वल करावे. प्राचार्य डॉ. एस.वाय. कोतमिरे, सातारा जिल्हा तलवारबाजी असोसिएशनचे सचिव सुधीर जमदाडे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. तीन प्रकारातून प्रत्येक चार असे बारा मुला-मुलींचा संघ निवडला जात असल्याची माहिती कोल्हापूर जिल्हा तलवारबाजी असोसिएशनचे अध्यक्ष विनोद जाधव यांनी दिली.

यावेळी प्रा. आझाद पटेल, निवड समितीचे चेअरमन प्रा. राहुल मगदूम, प्रा. रतन नाईकनवरे, पंच प्रफुल धुमाळ, संदीप जाधव, सुरज पोवार, राहुल सरडे, शुभम जाधव यांच्यासह तलवारबाजी स्पर्धेचे खेळाडू व शिक्षक उपस्थित होते.